लोकमत

# जे. एफ. पाटील यांना जीवन गौरव पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कसबा बावडा :** येथील डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाकडून दिला जाणारा 'डॉ. डी. वाय. पाटील जीवनगौरव पुरस्कार' अर्थतज्ज्ञ व शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांना जाहीर करण्यात आला. विद्यापीठाच्या वर्धापनदिनी १ सप्टेंबर रोजी पाटील यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.



प्रा. पाटील यांनी दीर्घकाळ शिवाजी विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. त्याशिवाय विद्यापीठ व सामाजिक संस्था, सरकारच्या विविध मंडळांवर सदस्य म्हणून आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. ते महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाचे सदस्य होते. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष व भारतीय कृषी अर्थशास्त्र परिषदेचे उपाध्यक्ष होते. त्यांची इंग्रजी व मराठीमध्ये अर्थशास्त्राची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत.

तसेच त्यांचे अर्थशास्त्रावर प्रासंगिक भाष्य करणारे अनेक लेख राष्ट्रीय संशोधन पत्रिकेमधून विविध वृत्तपत्रातून व मासिकातून प्रसिद्ध झालेले आहेत. डॉ. प्रा. पाटील यांच्या या निवडीबद्दल डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय पाटील व कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

लोकमत

# शिक्षणातून उदरनिर्वाहाचे साधन निर्माण व्हावे : शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारत असताना आपल्या अभ्यासक्रमातून निरंतर कौशल्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे अत्यंत गरजेचे आहे. या शिक्षणातून विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्षेत्रात यशस्वीपणे उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ. शिर्के बोलत होते. यावेळी शिर्के यांनी दर्जेदार कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम आजच्या काळाची गरज आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी केल्यास या शिक्षणाचा उपयोग निश्चितपणे विद्यार्थ्यांना होईल, असे सांगितले. यावेळी डॉ. नंदकुमार मेकोथ, विभागाचे संचालक डॉ. ए. एम. गुरव, हरिष बोहरा, प्राचार्य व्ही. ए. माने उपस्थित होते. वेबिनारला देशभरातून ३४६ शिक्षक, संशोधक, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आजच्या आव्हानात्मक परिस्थितीत शिक्षण क्षेत्रावर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याची जबाबदारी वाढली आहे. या आव्हानात्मक परिस्थितीमध्ये प्रत्येक विद्यार्थी गुणवत्तापूर्ण, उदरनिर्वाहक्षम बनविणे ही आपली जबाबदारी आहे.

लोकसत्ता

# प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांना जीवनगौरव पुरस्कार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** येथील डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचा डॉ. डी. वाय. पाटील जीवनगौरव पुरस्कार अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांना जाहीर झाला आहे. सन्मानपत्र, चांदीचे स्मृतिचिन्ह, १ लाख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

विद्यापीठाचा वर्धापनदिन १ सप्टेंबर रोजी होणार असून या कार्यक्रमात पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून त्यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे, असे शनिवारी सांगण्यात आले.



प्रा. पाटील हे शिवाजी विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. विद्यापीठ व सामाजिक संस्था तद्वतच शासकीय विविध मंडळांवर सदस्य म्हणून कार्याचा ठसा उमटवला आहे. ते शासनाच्या नियोजन विभागाचे सदस्य होते. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष व भारतीय कृषी अर्थशास्त्र परिषदेचे उपाध्यक्ष होते. समाजवादी प्रबोधिनीचे ते संचालक आहेत. त्यांची इंग्रजी व मराठी मध्ये अर्थशास्त्राची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य उत्तम शिक्षक पुरस्कार, डॉ. श्री. आ. देशपांडे जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय पाटील यांनी डॉ. डी. वाय. पाटील यांच्या नावाने आदर्श शिक्षक पुरस्कार, सेवक पुरस्कार, विज्ञानाचार्य, कार्यरत्न, संशोधक, गुणवंत विद्यार्थी असेही पुरस्कार देण्यात येणार असल्याचे सांगितले.

पुढारी

# ऑनलाईन परीक्षेला ३९ हजार ७३३ विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा


शिवाजी विद्यापीठातून...

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च -एप्रिल २०२१ च्या परीक्षांना प्रारंभ झाला आहे. शनिवारी ४२ हजार ८६० पैकी ३९ हजार ७३३ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. शनिवारी बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझाईन, मास्टर ऑफ व्हॅल्युशन, एम.ए., एम.एस्सी.-गणित, भगोलशास्त्र, बीसीए, एमसीए, एमएसडब्ल्यू, एमआरएस, एमपीए आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या.

बुधवार, दि. १८ ऑगस्ट रोजी झालेल्या परीक्षांमध्ये ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक कारणास्तव त्यांची परीक्षा देता आली नाही, अशा विद्यार्थ्यांनी संबंधित परीक्षेची माहिती unishivaji.ac.in / onlinc.unishivaji.ac.in या वेबसाईट पोर्टलवरील लिंकद्वारे त्यांचे निवेदन ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालित सादर करावे. विद्यापीठामार्फत देण्यात येणाऱ्या अधिकच्या सूचना त्वरित समजाव्यात यासाठी विद्यापीठाचे संकेतस्थळ, स्वतःचा ई-मेल व नोंदणीकृत मोबाईल पाहून त्याप्रमाणे नियोजन करावे, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

पुढारी

# कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमांतून उदरनिर्वाहाचे साधन निर्माण व्हावे

## कुलगुरू शिर्के; विद्यापीठात राष्ट्रीय वेबिनार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारत असताना अभ्यासक्रमांतून निरंतर कौशल्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. या शिक्षणातून विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्षेत्रात यशस्वीपणे उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी दर्जेदार कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम काळाची गरज आहेत. त्यांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास शिक्षणाचा उपयोग निश्चितपणे विद्यार्थ्यांना होईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ. शिर्के बोलत होते. यावेळी हरिष बोहरा, प्राचार्य व्ही. ए. माने उपस्थित होते. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आजच्या आव्हानात्मक परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याची जबाबदारी वाढली आहे. आव्हानात्मक परिस्थितीमध्ये प्रत्येक विद्यार्थी हा गुणवत्तापूर्ण, उदरनिर्वाहक्षम बनविणे ही जबाबदारी आहे. यासाठी कौशल्यपूर्ण अभ्यासक्रमांची अधिकाधिक रचना होऊन त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे बीजभाषण गोवा व्यवस्थापन संस्थेचे प्रा. डॉ. नंदकुमार यांनी केले. ते म्हणाले, आज केवळ कौशल्य प्रशिक्षण महत्त्वाचे आहे, याबाबत चर्चा होताना पाहतो. परंतु, कौशल्य विकासाकडे विद्यार्थ्यांनी सूक्ष्मपणे पाहून जीवन यशस्वीपणे जगण्यासाठी विविध कौशल्ये परिपूर्णतेने आत्मसात करणे गरजेचे आहे. याप्रसंगी डॉ. बी. एम. हिर्डेकर व डॉ. अनिल राव यांनी विचार मांडले. विभागाचे संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्राचार्य व्ही. ए. माने यांनी स्वागत केले. यावेळी शुभांगी जरंडीकर, डॉ. सुमन बुवा, महेश चव्हाण, यशोधन बोकील, अतुल एतवाडेकर उपस्थित होते.

### ऑनलाईन मार्केटिंग हा उपक्रम

ऑनलाईन कार्यक्रमात नवीन उद्योजकांना ऑनलाईन मार्केटिंग हा उपक्रम घेण्यात आला. यामध्ये कोल्हापुरी चप्पल, गूळ, मसाले, चांदीचे दागिने यांचे उद्योजक सहभागी झाले. तसेच ऑनलाईन सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

पुढारी

# ‘पर्यावरण अभ्यास’ विषयाची आज परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने रविवारी पदवी स्तरावरील सत्र चारमधील ‘पर्यावरण अभ्यास’ या विषयाची परीक्षा दुपारी १२.३० ते १.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. परीक्षेला ५१ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी बसणार आहेत.

परीक्षेचा यूजर आयडी व पासवर्ड विद्यार्थ्यांना एसएमएस व ई-मेलद्वारे पाठविण्यात आला आहे. परीक्षेची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवली आहे. परीक्षेसंबंधी विद्यार्थ्यांनी काही तांत्रिक अडचणी आल्यास शंकांचे निरसन करण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थी मुख्य परीक्षा देत असताना त्यांना कोणतीही तांत्रिक अडचण येऊ नये, यासाठी आवश्यक मॉक टेस्ट विद्यार्थ्यांनी त्वरित द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

सकाळ

# डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार जाहीर

## डॉ. जे. एफ. पाटील यांना जीवनगौरव पुरस्कार



जे. एफ. पाटील

कोल्हापूर, ता. २८ : येथील डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाकडून २०२१-२२ चा डॉ. डी. वाय. पाटील जीवनगौरव पुरस्कार अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांना जाहीर झाला. विद्यापीठाच्या बुधवारी (ता. १) होणाऱ्या वर्धापन दिनात पुरस्कार देण्यात येईल. सकाळी नऊ वाजता कार्यक्रमास सुरवात होईल.

प्रा. पाटील यांनी दीर्घकाळ शिवाजी विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. शिवाय विद्यापीठ व सामाजिक संस्था तद्वतच शासकीय विविध मंडळांवर सदस्य म्हणून कार्याचा ठसा उमटवला आहे. ते राज्य शासनाच्या नियोजन विभागाचे सदस्य होते. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष व भारतीय कृषी अर्थशास्त्र परिषदेचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते.

इचलकरंजी येथील समाजवादी प्रबोधिनीचे ते संचालक सदस्य आहेत. निवडीबद्दल डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय पाटील व कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. वर्धापन दिनाच्या निमित्ताने डॉ. डी. वाय. पाटील यांच्या नावाने आदर्श शिक्षक पुरस्कार, आदर्श सेवक पुरस्कार, विज्ञानाचार्य, कार्यरत्न, उत्कृष्ट संशोधक, गुणवंत विद्यार्थी असेही पुरस्कार देण्यात येणार आहेत. कार्यक्रमात प्रा. पाटील यांच्या 'अर्थाभिव्यक्ती' व 'Essays in Economics Persuasian' पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल विद्यापीठाच्या प्रगतीचा अहवाल सादर करणार आहेत.

सकाळ

# पर्यावरण अभ्यासची आज परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे पदवी स्तरावरील सत्र चारमधील ''पर्यावरण अभ्यास'' विषयाची परीक्षा उद्या (ता. २९) दुपारी १२.३० ते १. ३० यावेळेत होणार आहे. ही परीक्षा ५१ हजार विद्यार्थी देणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी मुख्य परीक्षा सुरू असताना तोंडी परीक्षा दिलेली नाही. त्यांनी ती त्वरित द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.